जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२५/०६/२०२३**
**दि.२४/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

## भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९२७/२०२३,भादविक ३९४,३५२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२९ वर्षे,रा.धानोरी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०६/२०२३ रोजी रात्रौ ०२/१० वा. बजाज शो-रुमचे समोरील रोडवर,पुणे-सोलापुर रोडवर,हडपसर पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कंपनीतील दोन साथीदार यांचेसह नमुद ठिकाणी ट्रॅव्हल्स बसची वाट पाहत असताना,दुचाकीवरील चार अनोळखी इसमांनी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातावर धारदार हत्याराने जोरात फटाका मारुन,त्यांचे डावे हाताला दुखापत करुन,फिर्यादी व साक्षीदार यांना धारदार हत्याराचा धाक दाखवुन,त्यांचे जवळील ०३ मोबाईल व २,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ५२,०००/- रुपये किंमतीचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अविनाश शिंदे ८९९९४७००१८ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ४०३/२०२३,भादविक ३०४(अ),३३८,३३७,२७९,मो.वा.का.क.१८४ |
| **फिर्यादी** | रेणुका साळुंखे,वय-३२ वर्षे,रा.माळवाडी,सोरतापवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०६/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वा. म्हसोबा मंदिर, वाकडा पुल सोरतापवाडी, |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांची बहिण छाया सुहास जाधव,वय ३४ वर्षे व दाजी सुहास शरद जाधव,वय ४० वर्षे यांचेसोबत मोपेडवरुन त्यांचे राहते घरी जात असतांना,यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे दाजी चालवित असलेल्या मोपेडला पाठीमागुन जोरात धडक देवुन,मोपेडवरील फिर्यादी यांची बहीण छाया जाधव हिस गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन,फिर्यादी व त्यांचे दाजी सुहास जाधव यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घोडके ८८८८८२००२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**